# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार**
**क्र. रामाआ/तक्रार/३३६/२०२३/नंदुरबार**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.अशोक मदन प्रकाशकर,<br>रा.मु.पो.१८, पटेलवाडी, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार. | वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल(रोहयो), यांचे कार्यालय, "वनभवन" तहसिल कार्यालय जवळ, मिशन हायस्कूल समोर, तळोदा रोड, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार-४२५४१२ |

**सुनावणी दिनांक-१०/०६/२०२५**

तक्रारदार यांनी दि.१७/०४/२०२३ रोजीच्या अर्जान्वये, "द्वितीय अपिल क्र. ५९३/२०२२/नंदुरबार, संदर्भात संबंधित शासकीय माहिती अधिकारी यांनी आपण दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी दिलेल्या मुदतीत केलेली नाही. तसेच त्यानंतर देखील १५ दिवस उलटून गेले असून देखील व त्यांचे कार्यालयात नियमित सदर माहिती हातोहात उपलब्ध करुन घेण्यासाठी हजर होवून देखील त्यांनी सदर माहिती पुरविण्याची टाळाटाळ चालूच ठेवलेली असल्यामुळे आपल्या स्तरावरुन उचित दखल घेण्यात येवून उचित कार्यवाही सुरु करावी, ही विनंती." असे नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१०/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी – तक्रारदार आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.०७/०९/२०२१ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"मग्रा रोहयो अंतर्गत अकुशस कामाची नांदर्खे, टाकलीपाडा, भोणे, खोक्राळे, वैंदाणे, ठाणेपाडा, अजेपुर, केवडीपाडा, हरिपुर, अंबापुर, खर्दे व तलवाडे व चाकळे या १३ गावांतील मजुरीची दि.१६/०६/२००८ ते ३१/०५/२०१२ व ०१/१०/२०१३ ते ३१/१०/२०१५ या कालावधीची हजेरीपत्रके ए-४ अटेस्टेड साईजमध्ये मिळणेबाबत."

४. आयोगाने, द्वितीय अपिल क्र.५९३/२०२२/नंदुरबार संदर्भात दि.०८/१२/२०२२ रोजी आयोगासमोर झालेल्या सुनावणीअंती दिनांक २२/०२/२०२३ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नंदुरबार (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार, श्रीमती.एस.सी.अवसरमल, यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि.०७/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध मुद्येनिहाय माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत."

५. सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दि.०९/०६/२०२५ रोजीचा अहवाल सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, श्री.अशोक मदन प्रकाशकर, रा.मु.पो.१८ पटेलवाडी, नंदुरबार यांचेबाबत द्वितीय अपिल आदेश क्रमांक५९३/२०२२ दि.२२/०२/२०२३ च्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल नंदुरबार यांच्याकडून तक्रारदार यांना माहिती पुरविण्यात न आल्याने तक्रारदार/अर्जदार यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तक्रार क्रमांक ३३६/२०२३ नंदुरबार दि.१०/०६/२०२५ अन्वये आपल्या दालनात सुनावणी ठेवण्यात आली असून महाशय आपणास विनंती करण्यात येते की, वनक्षेत्र नंदुरबार रोहयो या कार्यालयात लिपीक पद नसल्याने तसेच कार्यालय कर्मचारी वर्ग देखील पुरेसा नसल्याकारणाने माहिती संकलीत करुन अर्जदार यांना पाठविणे शक्य झाले नाही. तसेच, सदरची माहिती ही विस्तृत स्वरुपाची असून मागील १० वर्षापुर्वीची असल्याकारणाने ती माहिती वेळेत उपलब्ध करुन देणे शक्य झालेले नाही.

तसेच सध्या कार्यरत वनपरीक्षेत्र अधिकारी, रोहयो, नंदुरबार यांनी गेल्या १० महिन्यापुर्वीच वनक्षेत्रपाल नंदुरबार रोहयो या पदाचा कार्यभार स्विकारला असून तरी या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या अनुषंगाने दस्तावेज तपासुन अर्जदार यांना देय असलेली माहिती ही हातोहात पुरविण्याची दक्षता ठेवीत आहे.

६. सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, द्वितीय अपिल क्र.५९३/२०२२/नंदुरबार संदर्भात आयोगाने दिनांक २२/०२/२०२३ अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) नंदुरबार, यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेपाल, वनक्षेपाल (रोहयो) नंदुरबार, श्रीमती.एस.सी.अवसरमल , यांनी आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांना कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) नंदुरबार, यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत द्वितीय अपिल क्र.५९३/२०२२/नंदुरबार मध्ये आयोगाने दि.२२/०२/२०२३ अन्वये पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेपाल, वनक्षेपाल (रोहयो) नंदुरबार, श्रीमती.एस.सी.अवसरमल, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) प्रस्तुत तक्रार क्र.३३६/२०२३/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

उप वनसंरक्षक(प्रादेशिक व वन्यजीव), नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती समोर, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार, यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

जावक क्र. ८२७४ 10 DEC 2025